आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक ३० मे २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने स्वदेशी शस्त्रास्त्रे आणि 'मेक इन इंडिया'ची शक्ती जगासमोर प्रदर्शित केली आहे; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कानपूर मध्ये प्रतिपादन.

2. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी 'बायोचार'चा वापर करा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे शेतकऱ्यांना आवाहन.

3. संरक्षण मंत्रालयाच्या तीन कंपन्यांना मिनीरत्न श्रेणी-१ चा दर्जा.

4. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत.

<u>पंतप्रधान दौरा</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दुपारी उत्तर प्रदेशातील कानपूर येथे ४७,५७३ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या १५ मेगा विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. त्यांनी चुन्नीगंज आणि नयागंज दरम्यान कानपूर मेट्रोच्या नवीन कॉरिडॉरला हिरवा झेंडा दाखवला. सभेला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या रूपात संपूर्ण जगाने, आपल्या देशातील महिलांचा राग आणि वेदना पाहिल्या आहेत आणि भारताने पाकिस्तानमधील अनेक दहशतवादी अड्डे पूर्णपणे उद्ध्वस्त केले आहेत. ऑपरेशन सिंदूर दरम्यान थरथरणाऱ्या शत्रूने कोणत्याही भ्रमात राहू नये, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही, ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने स्वदेशी शस्त्रास्त्रे आणि मेक इन इंडियाची शक्ती जगासमोर प्रदर्शित केली आहे असे ते म्हणाले.....

*ऑपरेशन सिन्दूर में दुनिया ने भारत के स्वदेशी हथियारों और 'मेक इन इंडिया' की ताकत भी देखी है। हमारे ब्रह्मोस मिसाइल ने दुश्मन के घर में घुसकर तबाही मचाई जहाँ टारगेट तय किया वहाँ धमाके किए ये ताकत हमें आत्मनिर्भर भारत के संकल्प से मिली है।*

तत्पूर्वी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमधल्या काराकट इथं ४८ हजार ५०० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली.

बायोचार

शाश्वत आणि नैसर्गिक शेतीकडे वळण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे बायोचार आहे. बायोचारच्या वापरामुळे मातीचा दर्जा सुधारतो. जमिनीतील ऑरगॅनिक कार्बनचे प्रमाण वाढते. पोषणद्रव्य आणि पाणी टिकवून ठेवण्यात बायोचारची भूमिका महत्त्वाची आहे. कमी गुंतवणुकीत जास्त उत्पादन घेण्यासाठी नव्या प्रयोगांचा वापर करण्याची आज नितांत गरज आहे. अशात शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी बायोचारचा वापर शेतकऱ्यांनी करावा, असे आवाहन केंद्रीय नितीन गडकरी यांनी आज नागपूर येथे केले.....

*त्यामुळे टेक्नॉलॉजी चा उपयोग करणं ऑल **ॲ**ग्रिकल्चरला मेकॅनाईझ करणं त्याच्यामध्ये मी मुरकुटे साहेबांना आणि दिप वर्मांना धन्यवाद देईल, की त्यांनी अतिशय उत्तम अशा प्रकारचा बायोचारचे दोन तयार केलेल्या आहेत, **ॲ**ग्रिकल्चर कॉलेजमध्ये एक आहे. तुम्हाला जे योग्य वाटेल ते करा आणि या मार्फत जर तुम्ही आपल्या ज्या पराट्या आहेत ते जाळू नका, त्याने काय म्हटले आहे "ब्लॅक गोल्ड" जे नवीन नवीन चांगला आहे, प्रायोगिक आहे, यशस्वी आहे ते आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. उत्पादन वाढवा, उत्पादन खर्च कमी करा.आणि झालेला उत्पादनावर वॅल्यू एडिशन करून त्याला मार्केटिंग कसं करता येईल त्याची व्यवस्था करा.*

ॲग्रोव्हिजन फाउंडेशनच्या वतीने धापेवाडा येथील भक्ती फार्मस् येथे बायोचार निर्मिती प्रात्यक्षिक व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. माणसाला जशी श्वास घेण्यासाठी ऑक्सिजनची गरज असते, तशी जमिनीला ऑरगॅनिक कार्बनची गरज आहे. कृषीतज्ज्ञांनी बायोचारला 'ब्लॅक गोल्ड' म्हटले आहे. पिकांचे अवशेष जाळून तयार केलेला कोळशासारखा पदार्थ म्हणजे बायोचार आहे. आपल्याकडे उपलब्ध पऱ्हाटी व तुऱ्हाटी हा बायोचार तयार करण्यासाठी उत्तम बायोमास आहे.वर्ध्याच्या महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्था एमगिरी व्दारा ड्रम टाईप पायरोलायझर व बॉक्स टाईप पायरोलायझर या दोन प्रकारचे यंत्र तयार करण्यात आले आहेत.

सर्वपक्षीय शिष्टमंडळ

दहशतवादा विरोधात भारताची भूमिका जगाला पटवून देण्यासाठी गेलेल्या भारताच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने काल सौदी अरेबियातल्या तीन दिवसांच्या राजनैतिक मोहिमेचा समारोप केला. या शिष्टमंडळाचं नेतृत्त्व भाजपा खासदार बैजयंत पांडा यांनी केलं. त्यांच्या सौदी भेटीदरम्यान, भारतीय प्रतिनिधींनी रियाधमधील गल्फ रिसर्च सेंटरचे अध्यक्ष

डॉ.अब्दुल अजीज सागर आणि नायफ अरब युनिव्हर्सिटी फॉर सिक्युरिटी सायन्सेसचे अध्यक्ष डॉ.अब्दुल माजीद अल्बानयान यांची भेट घेतली.

अमित शहा

ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकव्याप्त काश्मीरच्या गोळीबारात सीमावर्ती भागातल्या मालमत्ता आणि धार्मिक स्थळांना झालेल्या नुकसानीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पूंछ शहराला भेट दिली. तसंच पाकव्याप्त काश्मीरच्या गोळीबारात बाधित झालेल्या कुटुंबांची भेट घेतली आणि त्यांच्या तक्रारी ऐकल्या, अशी माहिती आमच्या जम्मू इथल्या प्रतिनिधीने दिली. गृहमंत्र्यांनी बाधित कुटुंबांना आर्थिक मदत वाटप केली आणि गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना नियुक्तीपत्रेही वाटली. शहा यांनी पाकिस्तानी सैन्याने लक्ष्य केलेल्या आणि गोळीबारात नुकसान झालेल्या धार्मिक स्थळांनाही भेट दिली. ३ जुलैपासून सुरू होणाऱ्या वार्षिक अमरनाथ यात्रेसाठी सुरक्षा आणि इतर व्यवस्थांचाही शहा यांनी आढावा घेतला. यावेळी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

म्युनिशन्स इंडिया

संरक्षण मंत्रालयानं म्युनिशन्स इंडिया लिमिटेड, आर्मर्ड व्हेइकल्स निगम लिमिटेड आणि इंडिया ऑप्टेल लिमिटेड यांना मिनीरत्न श्रेणी-१ दर्जा मंजूर केला आहे. केवळ तीन वर्षात सरकारी संस्थांमधून नफा कमावणाऱ्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये रूपांतरित झाल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तिन्ही सार्वजनिक क्षेत्रातल्या संरक्षण उपक्रमांचं अभिनंदन केलं. कंपनीची उलाढाल वाढवण्यासाठी, संपूर्ण स्वदेशीकरण करण्यासाठी आणि मिनीरत्न दर्जा प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर निकषांची या तिन्ही संस्थांनी पूर्तता केल्याबद्दल सिंह यांनी समाधान व्यक्त केलं. मिनीरत्न दर्जा मिळाल्यामुळे या कंपन्यांना वेगवान वाढीचा मार्ग गाठायला आणि संरक्षण उत्पादन आणि निर्यातीत नवीन उंची गाठायला मदत होईल, असा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात संध्याकाळी 7.30 वाजता चंदीगडच्या मुलाणपूर येथील महाराजा यादवेंद्र सिंग क्रिकेट मैदानावर सामना होणार आहे. यातील विजेता संघ १ जून रोजी पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाबरोबर खेळेल. आणि या सामन्यातील विजेता संघ ३ जूनला

अहमदाबादमध्ये अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूशी लढत देईल. चंडिगडमध्ये काल झालेल्या पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघानं पंजाब किंग्जवर ८ गडी राखून विजय मिळवला आणि स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. पंजाब किंग्ज संघानं दिलेलं १०२ धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्सनं केवळ १० षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पार केलं.

<u>बोगस खत</u>

भंडारा जिल्ह्यात लाखनी कृषि उत्पन्न बजार समितीच्या कृषि केंद्रात बोगस 129 मॅट्रिक टन खत आढळल्याने कृषि विभागाने कारवाई केली आहे. यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाला अटक करण्यात आली आहे. लाखनी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषि केंद्रात ब्रह्मास्त्र नावाचा 129 मॅट्रिक टन खत विक्री करीता आणला होता. यातून शेतकऱ्यांना 821 बॅग विक्री केल्या होत्या. कृषी उत्पन्न बाजार समिती लाखनी येथील कृषी केंद्रात कृषी विभागाच्या वतीने तपासणी करण्यात आली. या ठिकाणी ब्रह्मास्त्र नावाचे खत आढळून आले. या खताचे नमुने घेऊन तपासणीला पाठविले होते. तपासणी अहवालात हे खत गुणवत्ता पूर्ण नसल्याचे दिसुन आले.

<u>सेवानिवृत्ती</u>

आकाशवाणी नागपूरच्या अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले सहायक अभियंता आतिक अहमद शेख आपल्या 38 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर 31 मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत त्यांनी आपल्या कार्यकाळामध्ये दूरदर्शन केंद्र अहमदाबाद, अकोला, नागपूर, चंद्रपूर येथे आपल्या सेवा दिल्या.

<u>हवामान</u>

हवामान-पुढील एका तासात नागपूर, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी सुद्धा असेच हवामान राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, आज नागपूर मध्ये संध्याकाळपासूनच ढगाळ वातावरण असून, काही वेळाच्या पावसामुळे शहरातील काही भागांच्या रस्त्यावर पाणी साचले आहे

अविनाश साबळे

दक्षिण कोरियात सुरू असलेल्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेनं तीन किलोमीटर अडथळयाच्या शर्यतीत सुवर्ण पदक पटकावलं. याबद्दल बीड जिल्ह्यातल्या मांडवा या त्याच्या आज गावी आनंदोत्सव साजरा केला जात आहे. ग्रामस्थ तसंच अविनाशच्या प्राध्यापकांनी त्याच्या कुटुंबीयांना पेढे भरवत आनंद व्यक्त केला.

******